**निशाणी क्र.३५**

**सरकारतर्फे साक्षीदार क्र.१ चा सरतपासः–**

मी याद्वारे शपथेवर साक्ष देतो की,

माझे नावः –रामचंद्र दौलाप्पा सगर,

वय – ८० वर्षे, व्यवसाय–शेती,

राहणार – रा. अंबुलगा, ता.निलंगा, जि. लातूर

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदाराचा सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती एस.आर पाटील यांचे मार्फत सुरुः–**

१. मी फिर्यादी व आरोपींना ओळखतो. ते माझ्या गल्लीतील आहेत. फिर्यादी ही मयत आहे. आरोपी आणि फिर्यादीमध्ये काय घटना घडली होती हे मला माहीत नाही. पोलीसांनी माझा जबाब घेतला नव्हता.

साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करीत नसल्याकारणाने अभियोग पक्षातर्फे भारतीय पुरावा कायदा कलम १५४ नुसार प्रश्न विचारण्याची परवानगी मागणेत आली**.** वस्तुस्थितीची पाहणी करता व साक्षीदाराचे विसंगत विधान बघता सदर परवानगी देणेत आली.

२. हे म्हणणे खरे नाही की, दि.१६.०४.२०१८ रोजी सकाळी ६.३० च्या सुमारास अंगणवाडीजवळ आरोपी आणि फिर्यादी यांचे भांडण झाले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी, वाल्मीक आंबाटे, सोनाबाई सुर्यवंशी, सुमित्रा वरवटे त्या भांडणाचा आवाज ऐकून घटनाठिकाणी गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी हे पुष्पाबाई हीस वाटणी करुन दे म्हणून शिवीगाळ व धक्काबुक्की करत होते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.१ ने उस तोडण्याच्या कोयत्याने फिर्यादीच्या डाव्या हातावर मारहाण केली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.२ ने फिर्यादीला डाव्या मांडीवर, पाठीत मारहाण केली. हे म्हणणे खरे नाही की,

आरोपींनी फिर्यादीला जीवे मारण्याची धमकी दिली. हे म्हणणे खरे नाही की, सदरचे भांडण मी स्वतः पाहिले होते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी याला मदत करण्याकरीता मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास आरोपी तर्फे अॅड. ए.एस.माकणे यांनी नाकारला.**

**फेरतपास नाही.** **श्रवणोत्तर स्वीकृत.**

Digitally signed by GUNJAVATE APARNA SHIVAJI
Date: 2025.03.11 17:38:16 +0530

(**श्रीमती.ए.एस.गुंजवटे**)

दिनांक–११/०३/२०२५. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.२,
निलंगा